**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २२५** **दिनांक :- २३/०८/२०२१**

## <u>अनधिकृत वेश्याव्यवसायावर कारवाई करुन ०४ पिडित मुलींची सुटका.</u>

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे वपोनि श्री. एस. एस. पाटील यांना गोपनिय माहिती मिळाली की, महिला वेश्यादलाल नामे पुजा पुजारी व तीचा साथीदार रोशन सोनवणे हे पुरुष गि-हाईकांना वेश्यागमनाच्या मोबदल्यात मुली पुरवितात. अशी गोपनीय माहिती मिळाल्याने वपोनी/पाटील यांनी बोगस गि-हाईक व पंच यांना पाठवुन मिळालेल्या बातमीची सत्यता पडताळून दि. २०/०८/२०२१ रोजी १३.२० वा. स्व. गोपीनाथ मुंडे क्रिडा संकुल समोर गोल्डन नेस्ट रोड नवघर भाईंदर पुर्व या ठिकाणी छापा टाकला असता महिला वेश्या दलाल पुजा विदयाधर पुजारी वय २२ वर्ष रा. रु.नं.२०१, गोडदेव गाव, अभिनव शाळेजवळ, भाईंदर पूर्व मुळगाव-बसवा, कल्याण, कर्नाटक व तीचा साथीदार २) रोशन अंकुश सोनवणे वय २१ वर्ष रा. रु.नं.२६, गांधीनगर झोपडपटटी, जनार्दन रकवी मार्ग, पठाडीया कॉम्प्लेक्स समोर, भाईंदर पश्चिम मुळगाव-सांगली हे वेश्यागमनाच्या मोबदल्यात पुरुष गि-हाईकाकडुन पैसे स्विकारुन मुली पुरवित असताना मिळुन आल्याने त्यांना वेश्यागमनाकरीता स्विकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ३ अल्पवयीन मुली व १ प्रौढ मुलीची सुटका केली. सदर बाबत महिला वेश्यादलाल पुजा पुजारी व साथीदार रोशन सोनवणे यांचे विरुद्ध नवघर पोलीस ठाणे येथे पोहवा/२२६९ उमेश पाटील यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि क्र.५७९/२०२१ भा.द.वि. कलम -३६६(अ),३७०, ३४, सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ सह बालकाचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १२, १८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, सपोनि. तेजश्री शिंदे (भरोसा सेल), पोहवा/२२८९ निलंगे, मपोना./१७८९ यम्बर, पो.शि./३६६० केशव शिंदे, मपोशि/१०७८ सुप्रिया तिवले व चालक पो.ना./२६३८ गावडे सर्व नेमणुक-अनैतिक मानवी वहातुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर (प.) यांनी केली आहे.

-----ooooo-----